# सत्र – १ : घटक – २

## भारतातील लोकसंख्या (Population in India)

२.० उद्दिष्टये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतातील लोकसंख्येचे आकारमान आणि लोकसंख्या वाढीची कारणे

२.२.२ भारतातील लोकसंख्येची रचनात्मक वैशिष्ट्ये

२.२.३ लोकसंख्यावाढ व भारतातील आर्थिक विकास

२.२.४ भारतातील लोकसंख्याविषयक धोरण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

अ) दिर्घोत्तरी प्रश्न ब) टिपा लिहा.

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

**१.० उद्दिष्ट्ये :**

'भारतातील लोकसंख्या' या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील बाबी ध्यानात येतील.

* भारतीय लोकसंख्येचे स्वरूप लक्षात येईल.
* भारतीय लोकसंख्येच्या आकारमानाचा अभ्यास करता येईल.
* भारतीय लोकसंख्या वाढीच्या दराची स्थिती ध्यानात येईल.
* लोकसंख्येतील वाढ आणि आर्थिक विकास यातील संबंध लक्षात येईल.
* भारतीय लोकसंख्या विषयक धोरणाची कल्पना येईल.

## २.१ प्रस्तावना :

घटक क्रमांक १ च्या अभ्यासाद्वारे आपण भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल, समावेशक वाढ आणि भारतीय अर्थव्यवस्था याविषयी सविस्तर अभ्यास केला आहे. या घटकामध्ये आपण भारतातील लोकसंख्येचे आकारमान, लोकसंख्या वाढ, वाढीचा दर, लोकसंख्या विषयक धोरण तसेच लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास या बाबींचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील लोकसंख्या आणि तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती यावर अवलंबून असते. त्या देशातील लोकसंख्या आणि त्या देशाचे उत्पादन यांचा परस्परांशी अगदी निकटचा संबंध असतो. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा मुख्यत: त्यावरून ठरत असतो. लोकसंख्येचा आकार, स्त्री-पुरुष प्रमाण, व्यवसाय विभागणी, लोकांची उपक्रमशीलता, तांत्रिक ज्ञान या घटकांवरच त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त उपयोग केला जातो. विकसनशील देशात वेगाने वाढणारी लोकसंख्या ही एक गंभीर समस्या ठरते. भारतातही लोकसंख्येच्या अतिरिक्ततेमुळे लोकसंख्या विस्फोटाची (Population Explosion) स्थिती निर्माण झाली आहे.

### २.२.१ भारतातील लोकसंख्येचे आकारमान आणि वाढीची कारणे :

भारतातील लोकसंख्येचा अभ्यास करताना देशाच्या लोकसंख्येत गेल्या शतकात झालेली वाढ व त्या वाढीची विविध कारणे विचारात घेणे अधिक उचित ठरते.

**(१) लोकसंख्येचे आकारमान :**

लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताच्या लोकसंख्येचा आकार खूपच मोठा आहे. लोकसंख्येच्या आकारावरून भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. जगातील इतर देशाच्या तुलनेत भारतातील लोकसंख्या वाढीचा दर उच्च राहिला आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी जवळ-जवळ २.४% भूमी भारताच्या वाट्याला आली आहे तर जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी १६.७% लोकसंख्या भारतात राहते आहे.

भारतात पहिली जनगणना १८८१ मध्ये झाली. त्यानंतर दर १० वर्षातून एकदा भारतात नियमितपण शिरगणती केली जाते. भारताच्या लोकसंख्या वाढीची कल्पना कोष्टक क्रमांक २.१ वरुन ध्यानात येईल.

**तक्ता क्र. २.१**

**भारताची लोकसंख्या वाढ**

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | लोकसंख्येतील दरवार्षिक वाढ (कोटी) | वार्षिक लोकसंख्या वाढ |
|---|---|---|---|
| १९०१ | २३.६ | ०० | ०० |
| १९११ | २५.२ | + १.६ | + ०.५७ |
| १९२१ | २५.१ | – ०.१ | – ०.०३ |
| १९३१ | २७.९ | + २.८ | + १.१ |
| १९४१ | ३१.९ | + ४.० | + १.४ |
| १९५१ | ३६.१ | + ४.२ | + १.३ |
| १९६१ | ४३.९ | + ७.८ | + २.१ |
| १९७१ | ५४.८ | + १०.९ | + २५ |
| १९८१ | ६८.४ | + १३.५ | + २.७ |
| १९९१ | ८४.४ | + १६.१ | + २.४ |
| २००१ | १०२.७ | + १८.३ | + २.१ |
| २०११ | १२१.२ | + १७.६४ | + १.६४ |

संदर्भ : Datt/Sundaram - Indian Economy - 2011 S. Chand & Company, New Delhi.

वरील कोष्टकावरून भारताची लोकसंख्या किती मोठ्या प्रमाणात वाढत आहे हे लक्षात येते.

१९२१ चा अपवाद वगळता भारताची लोकसंख्या सतत वाढत आहे. या काळात साथीचे रोग, महापूर, अवर्षण इ. मुळे लोकसंख्येत घट झाली आहे. १९११ ते १९२१ य दशकात भारताच्या लोकसंख्येत २५.२ कोटीवरून २५.१ कोटीपर्यंत घट झाली. म्हणून १९२१ हे वर्ष 'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष' म्हणून ओळखले जाते.

१९२१ ते १९५१ या कालखंडात देशातील लोकसंख्या २५.९ कोटीवरून वाढली. या तीस वर्षांच्या काळात देशातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक सरासरी दर १.२२% इतका राहिला.

१९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. ती १९८१ मध्ये ६८.३ कोटीपर्यंत वाढली. य काळातील लोकसंख्या वाढीचा एकत्रित दर वार्षिक २.१४% होता.

१९८१ ते २००१ या वीस वर्षाच्या काळात भारतातील लोकसंख्या वाढीचा दर कमी झालेला दिसून येतो. या २० वर्षाच्या कालखंडात भारताची लोकसंख्या ६८.४ कोटीवरून १०२.७ कोटीपर्यंत वाढली म्हणजेच १९८१ ते २००१ या दोन दशकात भारताच्या लोकसंख्येत सुमारे ३५ कोटींनी भर पडली. या वीस

वर्षात लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर २.५% इतका राहिला.

**भारतातील लोकसंख्या वाढीची कारणे :**

स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या खूपच वेगाने वाढलेली दिसून येते. भारताची लोकसंख्या जलद गतीने वाढण्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भारतातील हवामान :** भारतातील लोकसंख्या वाढण्याचं कारण हवामान हे एक आहे. भारतातील हवामान उष्ण आहे आणि अशा हवामानात मुले-मुली लवकर वयात येतात. त्यामुळे त्यांची लग्ने लवकर होतात. प्रजननास लहान वयातच सुरवात झाल्याने लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**२) विवाहाची सार्वत्रिक प्रथा :** भारतात लग्न हा धार्मिक विधी मानला जातो. त्यामुळे लग्न करण्याच्या वयात भारतातील सर्व स्त्री-पुरुष विवाह करतात. पर्यायाने नवीन जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण वाढते. सार्वत्रिक विवाहाच्या या प्रथेमुळे भारततील लोकसंख्या जलद गतीने वाढते.

**३) बालविवाह पध्दत :** भारतात बालविवाहाची पध्दत बऱ्याच ठिकाणी रुढ आहे. लहान वयात लग्न झाल्याने प्रजोत्पादनासाठी बराच काळ मिळतो व त्यामुळे लोकसंख्या वाढते. भारतातील ८१% मुलींचे लग्ने १५ ते २० वर्षांच्या वयामध्ये होतात. हे वय प्रजोत्पादनाच्या दृष्टीने अधिक प्रबळ असते. त्यामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढते.

**४) दारिद्र्य :** भारतीय लोकांचे दारिद्र्य हे ही भारतातील लोकसंख्या वाढीचे कारण झाल आह. भारतीय लोकांच्या गरीब परिस्थितीमुळे घरात अधिकाधिक मुलांचा जन्म झाला. जेवढी अधिक मुले होतील तेवढी ती शेतीसाठी किंवा इतरत्र कामधंदा करुन पैसे मिळवतील. म्हातारपणी भाकरीला आधार मिळावा म्हणून अधिक मुलांना जन्माला घातले जाते. पर्यायाने लोकसंख्येत वाढ होते.

**५) बहुपत्नित्व :** भारतात आता द्विभार्या प्रतिबधंक कायदा करण्यात आला. तरी आजही एखाद्या पुरुषाने अनेक स्त्रियांशी विवाह केल्याचे आढळतात. मुस्लीम समाजाला याबाबत कायदेशीर निर्बंध नाहीत. अनेक स्त्रियांशी विवाह म्हणजे लोकसंख्येत मोठी वाढ होय.

**६) अशिक्षित व अज्ञानी जनता :** भारतात पितृप्रधान समाजव्यवस्था असल्याने मुलगा जन्माला आला तरच आपल्या घराण्याचे नाव व परंपरा चालू राहील असे मानले जाते. त्यामुळे भारतात मुलगा होईपर्यंत मुलांची संख्या वाढविली जाते.

तसेच श्राध्द हे मुलानेच केले पाहिजे, तर पितरांना सद्‌गती मिळते अशी समजूत असल्याने मुलगा होईपर्यंत अपत्यांची संख्या वाढत जाते व पर्यायाने लोकसंख्या वाढते.

**७) करमणुकीच्या साधनांचा अभाव :** लोकांचे लक्ष लैंगिक सुखाकडून वळवायचे असेल तर देशात करमणुकीच्या भरपूर सोई असणे गरजेचे आहे. भारतात करमणुकीच्या फारशा सोयी उपलब्ध नाहीत.

त्यामुळे विवाहीत स्त्री-पुरुष लैंगिक सुखाकडे वळतात व लोकसंख्येत वाढ होते.

**८) एकत्र कुटुंब पध्दती :** एकत्र कुटुंब पध्दतीत घराचा खर्च एकत्रितरित्या चालत असतो. त्यामुळे आपल्याला कितीही मुले झाली तरी त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी ही कुटुंबाची सामुदायिक जबाबदरी मानली जाते. त्यामुळे कोणीही आपले कुटुंब मर्यादित करण्याचा विचार करत नाही. भारतात अजूनही एकत्र कुटुंबपध्दतीचे अस्तित्व असल्याने फार मोठ्या प्रमाणात भारताची लोकसंख्या वाढत आहे.

**९) भारतात कुटुंबनियोजनाला विरोध :** सरकारने कुटुंबनियोजन मोहिम राबविली तरी भारतातील बहुसंख्य समाज निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे सरकारी पातळीवर राबविलेली ही मोहिम तितकीशी यशस्वी झाली नाही. कुटुंबनियोजन कार्यक्रमाविषयी लोकांमध्ये निरुत्साह व उदासीनता असल्याने भारताची लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**१०) जननदर अधिक व मृत्यूदर कमी :** २००१ च्या शिरगणतीनुसार भारतात जननदर २५.८ आहे तर मृत्यूदर ८.५ आहे. म्हणजेच गेल्या काही वर्षापासून भारतात जननदर अधिक आहे व मृत्यूदर कमी असल्याने भारताची लोकसंख्या एकसारखी वाढतच आहे.

**११) आरोग्यविषयक सोईत वाढ :** स्वातंत्र्यानंतर देशात अनेक प्रकारची प्रभावी औषधे शोधून काढण्यात आली. अनेक रोगांचे निर्मुलन करणाऱ्या मोहिमा राबविण्यात आल्या. ग्रामीण भागात आरोग्यकेंद्र स्थापन करण्यात आली. स्त्रियांना प्रसूतीकाळात सोई उपलब्ध झाल्या. त्यामुळे बाळंतपणाच्या काळात मृत्युमुखी पडणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे लोकसंख्येत भर पडत गेली.

**१२) विधवांचे पुन:र्विवाह :** सध्या भारतात सामाजिक परिवर्तन झाल्याने अलिकडे विधवा स्त्रिया पुन्हा विवाह करु लागल्या. विधवांच्या पुनर्विवाहामुळे भारताची लोकसंख्या वाढत आहे.

**१३) दुष्काळ नियंत्रण :** पूर्वी दुष्काळाची तीव्रता इतकी जबरदस्त असे की अन्न-पाण्याअभावी लाखो लोक मृत्यूमुखी पडत असत. परंतु आता दुष्काळावर प्रभावीपणे मात करणे शक्य झाल्याने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या कमी झाली. पर्यायाने लोकसंख्या वाढत गेली.

**१४) शेती हा प्रमुख व्यवसाय :** भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील जवळ-जवळ ७५% लोक ग्रामीण भागात राहतात व शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतकऱ्याला जेवढी जास्त मुले तेवढी ती शेतीकामात मदत करतात. त्यामुळे ग्रामीण भागात कुटुंबाचा आकार मोठा राहून लोकसंख्या जलद गतीने वाढते आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात ............. क्रमांक लागतो.

अ) पहिला ब) दुसरा क) तिसरा ड) पाचवा

(२) १९२१ हे वर्ष लोकसंख्येच्या .................. वर्ष म्हणून ओळखले जाते.

अ) महत्त्वाचे  ब) वाढीचे  क) महाविभाजनाचे ड) लोकसंख्या घटीचे

**२.२.२ भारतीय लोकसंख्येची रचनात्मक वैशिष्ट्ये :** Demographic Profile of Population in India:

भारतातील लोकसंख्येची वैशिष्ट्ये अभ्यासताना आपणास जननदर व मृत्युदरातील तफावत, स्त्री-पुरुष प्रमाण, लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी, सरासरी आयुर्मान, साक्षरता प्रमाण इत्यादि बाबतीत १९५१ नंतर झालेला बदल ध्यानात घेणे उचित ठरते, या सर्व घटकांचे तपशीलवार विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) जननदर आणि मृत्यूदर :** प्रतिवर्षी १००० लोकांमागे जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे जननदर होय. उच्च जन्मदर हे भारतीय लोकसंख्येचे वैशिष्ट्य आहे. तसेच दरवर्षी १००० लोकामागे मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर होय. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील मृत्यूदर वेगाने घटलेला आहे. पुढील कोष्टकावरून भारतातील जननदर आणि मृत्यूदरात झालेल्या बदलांची कल्पना येईल.

**तक्ता क्र. २.२**

**भारतातील जननदर व मृत्यूदर**

| कालावधी (वर्ष) | जननदर (दर हजारी) | मृत्यूदर (दर हजारी) |
|---|---|---|
| १९५१ | ४०.० | १८.० |
| १९७१ | ३६.९ | १४.९ |
| १९८१ | ३३.९ | १२.५ |
| १९९१ | २९.५ | ९.८ |
| २००१ | २५.८ | ८.५ |
| २०११ | २०.९७ | ७.९ |

संदर्भ : Datt/Sundaram - Indian Economy, 62nd Edition 2011, P.No. 43, Table No.2

कोष्टक क्रमांक २.२ वरुन भारतात स्वातंत्र्योत्तर काळात मृत्यूदरात वेगाने घट झालेली दिसून येते. तर जननदर अद्यापही अधिक असलेला दिसून येतो. परिणामी भारतीय लोकसंख्या वाढीचा वेग अधिक असलेला दिसून येतो. भारतातील उष्ण हवामान, बालविवाहाची प्रथा, निरक्षरता, निकृष्ट राहणीमान, एकत्र कुटुंबपध्दती, स्त्री-साक्षरतेचे अल्प प्रमाण, दारिद्र्य, बेकारी इ. कारणांमुळे भारतातील जननदर उच्च राहिला आहे. तर दुष्काळावर विजय, पिण्याच्या पाण्याची सोय, सार्वजनिक आरोग्य सेवेत सुधारणा, रुग्णालयांच्या संख्येत वाढ, दळणवळणाच्या सोईत सुधारणा, बालमृत्यूदरात वेगाने घट इ. मुळे मृत्यूदरात वेगाने घट झालेली दिसून येते.

**(२) स्त्री-पुरुष प्रमाण :** दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे असणारे प्रमाण म्हणजे स्त्री-पुरुष प्रमाण होय. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात पुरूषांच्या संख्येच्या मानाने स्त्रियांच्या संख्येत घट होत असल्याचे

आढळते. भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पाश्चात्य राष्ट्रांच्या तुलनेने स्त्रियाची संख्या कमी असल्याची दिसून येते. हे पुढील कोष्टकावरून दिसून येते.

**तक्ता क्र. २.३**

**लोकसंख्येची लिंगभेदानुसार विभागणी**

| वर्ष | दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे |
|---|---|
| १९०१ | ९७२ |
| १९२१ | ९५५ |
| १९५१ | ९४६ |
| १९६१ | ९४१ |
| १९७१ | ९३० |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२७ |
| २००१ | ९३३ |
| २०११ | ९४० |

**Source :** Census of India 2011

कोष्टक क्रमांक २.३ वरुन भारतात स्त्री पुरूष प्रमाण दिवसेदिवस कमी होत असलेले दिसून येते. स्वातंत्र्यानंतर नियोजनपूर्वके प्रयत्न करूनही भारतात स्रियांचे प्रमाण कमी राहिले आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे मूलीच्या जन्माकडे पाहण्याचा समाजाचा बदलता दृष्टीकोन होय. तसेच अलीकडील काळातील मोठ्या प्रमाणावर झालेल्य स्त्रीभ्रूण हत्या हे होय.

अर्थव्यवस्थेत सामाजिक समतोल साधण्यासाठी देशाच्या व शहरी भागात मुलींच्या जन्माकडे पाहण्याचा सदोष दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे

**३) लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी :** देशाच्या लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी केल्यास एकूण लोकसंख्येत काम करणाऱ्यांचे प्रमाण काय आहे हे समजू शकते. भारतात परावलंबित्वाचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते कारण १४ वर्षापेक्षा लहान बालकांचे प्रमाण आणि ६० वर्षापेक्षा अधिक वय असणारे वृद्ध लोक यांचे प्रमाण अधिक आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतातील उच्च जननदर हे होय. पुढील कोष्टकावरून भारतातील लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी अभ्यासता येईल.

**तक्ता क्र. २.४**

**भारतीय लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी (आकडेवारी %)**

| (वर्ष) | वयोगट | | |
|---|---|---|---|
| | ० ते १४ | १५ ते ६० | ६० पेक्षा अधिक |
| १९२१ | ३९.२ | ५९.६ | १.२ |
| १९३१ | ३८.४ | ६०.२ | १.५ |
| १९५१ | ३७.४ | ५७.१ | ५.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५४.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| २००१ | ३५.५ | ५८.२ | ६.३ |
| २०११ | २९.१ | ६५.४ | ५.५ |

संदर्भ : Ashwani Mahajan Indian Econony 2012 S. Chand and Company, New Delhi

कोष्टक क्रमांक २.४ वरून सन १९५१ पूर्वी भारतीय लोकसंख्येत ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील लोकांचे प्रमाण १ ते २% च्या दरम्यान होते. परंतु १९५१ ते २०११ या काळात ते सरासरी ६% इतके झाल्याचे आढळते. देशात वैंद्यकीय सुविधांचा विकास शासकीय योजनांचा लाभ इ. मुळे हे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**३) लोकसंख्येची शहरी व ग्रामीण विभागणी :**

भारतीय लोकसंख्येचा अभ्यास करताना भारताची लोकसंख्या ग्रामीण-शहरी भागात कशी विभागली आहे. हे अभ्यासणे महत्वपूर्ण ठरते. देशातील एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि किती लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि किती लोकसंख्या शहरी भागात राहते याची माहिती घेणे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे ठरते. कारण आर्थिक विकासाचा वेग औद्योगिकरणांचा वेग आणि शहरीकरण यांचा जवळचा संबध असतो. कोष्टक क्रमांक २.५ वरून भारतीय लोकसंख्येचे शहरी-ग्रामीण विभागणी कशी झाली आहे हे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. २.५**

**भारतातील शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण**

| वर्ष | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| १९०१ | ९८.०% | ११.०% |
| १९५१ | ८२.७% | १७.३% |
| १९६१ | ८२.०% | १८.०% |
| १९७१ | ८०.०% | १९.८% |
| १९८१ | ७६.७% | २३.३% |
| १९९१ | ७४.३% | २५.७% |
| २००१ | ७२.२% | २७.८% |

कोष्टक क्रमांक २.५ वरून आपणास भारतात १९५१ मध्ये फार मोठ्या प्रमाणात ८२.७% लोकसंख्या खेड्यात राहत होती. यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर फरक पडलेला दिसून येत नाही. अद्यापही भारताच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या राहत असल्याने भारतात जननप्रमाण जास्त आहे. असे दिसून येते.

**५) लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी :**

देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि विकासाची अवस्था समजण्यासाठी लोकसंख्येची विविध व्यवसायात कशा रितीने विभागणी झालेली आहे. हे समजणे आवश्यक आहे. भारतात व्यवसायानुसार प्रमुख तीन क्षेत्रात विभागणी केली जाते.

**१) प्राथमिक क्षेत्र :** प्राथमिक क्षेत्रात शेती, वन, पशूसंवर्धन, मासेमारी इ. व्यवसायांचा समावेश होतो. या व्यवसायात निसर्गाची भूमीका फार महत्वाची ठरते.

**२) द्वितीय क्षेत्र :** या क्षेत्रात लघु व मोठे उद्योग धंदे, बांधकाम,खाणी इ. व्यवसायांचा समावेश होतो. शेतीक्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार पुरविण्याचे काम या क्षेत्रातून केले जाते त्यामूळे भारतातील औद्योगिकरणाचा वेग वाढविणे आवश्यक आहे.

**३) तृतीय क्षेत्र :** या क्षेत्रात वाहतूक दळणवळण, व्यापार, शिक्षण वैद्यकीय व्यवसाय अभियंते, बँक व्यवसाय इ. चा समावेश होतो. या सेवांची निर्मिती करणाऱ्या व्यवसायांचा या क्षेत्रात समावेश होतो.

१९५१ ते २००१ या काळातील भारताच्या लोकसंख्येच्या व्यावसायिक विभागणीत झालेला बदल कोष्टक क्रमांक २.६ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. २.६**

**लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (टक्केवारी)**

| व्यावसायिक क्षेत्र | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक क्षेत्र | ७२.१ | ७१.८ | १७.१ | ६८.८ | ६६.७ | ५८.४ |
| द्वितीय क्षेत्र | १०.७ | १२.२ | ११.२ | १३.५ | १२.७ | १६.२ |
| तृतीय क्षेत्र | १७.२ | १६.० | १६.७ | १७.५ | २०.५ | २५.४ |

संदर्भ : महाजन अश्विनी भारतीय अर्थव्यवस्था २०१२

क्रमांक २.६ कोष्टकावरून भारतीय लोकसंख्येच्या व्यावसायिक विभागणीत फरसा बदल झालेला आहे. प्राथमिक क्षेत्रातील लोकांचे प्रमाण मोठे असल्याने भारत हा अविकसित देश समजला जातो.

**६) लोकसंख्येची घनता :** एक चौरस किलोमीटरच्या क्षेत्रात सरासरी किती लोक रहातात त्याला त्या प्रदेशाची घनता असे म्हणतात. लोकसंख्येचे आरोग्य व गुणवत्ता ही मानव ज्या वातावरणात रहातो त्यावर अवलंबून असते. सामान्यपणे लोकसंख्येची घनता ही अनुकूल हवामान, औद्योगिक प्रगती, भौगोलिक परिस्थिती जमिनीची सुपीकता इ. बाबीवर अवलंबून असते.

लोकसंख्येच्या घनतेचा संबंध देशात उपलब्ध संबधीत असतो. नैसर्गिक साधनसंपत्ती व तंत्रज्ञानाच्या वापराशी संबधीत असतो. भारतात काही घटकराज्यात लोकसंख्येची घनता जास्त आहे तर काही ठिकाणी ती कमी असलेली दिसून येते. लोकसंख्येची घनता आणि दारिद्र्य अगर राहणीमानाचा फारसा संबध नाही असे असले तरी भारतात मुंबई, दिल्ली, कलकत्ता इ. शहरात लोकसंख्येची घनता जास्त असल्याने याठिकाणी विविध सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत.

तक्ता क्रमाक २.७ वरुन आपणांस भारतातील लोकसंख्येच्या घनतेची कल्पना येते.

**तक्ता क्र. २.७**

**भारतातील लोकसंख्येची घनता**

| वर्ष | घनता |
|---|---|
| १९०१ | ७७ |
| १९६१ | १४२ |
| १९९१ | २६७ |
| २००१ | ३२५ |
| २०११ | ३८२ |

| घटकराज्य | घनता |
|---|---|
| दिल्ली | ११२९७ |
| छत्तीसगड | ९२५२ |
| महाराष्ट्र | ३६५ |
| अरूणाचल प्रदेश | १७ |
| अंदमान निकोबार | ४६ |

कोष्टक क्रमांक २.७ वरून भारतातील लोकसंख्येची घनता स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात वाढत असेलली दिसून येते. तसेच भारताच्या विविधि घटकराज्यात ती वेगवेगळी असलेली दिसते. भारतात दिल्ली मध्ये ती सर्वाधिक (११२९७) तर सर्वात कमी अरूणाचल प्रदेश मध्ये (१७) इतकी आहे. म्हणजेच लोकसंख्येची घनता भारताच्या सर्व प्रदेशात भिन्न असलेली दिसून येते.

**७. सरासरी आयुर्मान :**

मनुष्य जन्माला आल्यानंतर सरासरी किती वर्षे जगू शकेल याला सरासरी आयुर्मान असे म्हणतात. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात सरासरी आयुर्मान कमी होते. सन १९५१ भारताचे सरासरी आयुर्मान कमी होते. सन १९५१ साली भारताचे सरासरी आयुर्मान केवळ ३६.७ होते. ते सन १९८१ मध्ये ५४.४ वर्षे झाले. १९३१ मध्ये ६०.३ वर्षे झाले

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात वैद्यकीय सोईच्या अभावामुळे सरासरी आयुर्मान कमी होते. मात्र स्वातंत्र्योत्तरकाळात साथीच्या रोगांचे नियंत्रण वैद्यकीय सोयींची वाढ, शिक्षण प्रसार, उच्च रहाणीमान इ. मुळे भारतातील सरासरी आयुर्माण दिवसेदिवस वाढत असलेले दिसून येते.

**८. साक्षरता प्रमाण :**

साक्षरता प्रमाण हा लोकसंख्येचा अभ्यासाचा एक महत्त्वाचा घटक असतो. भारतातील लोकसंख्येच्या साक्षरता प्रमाणावरून देशाच्या लोकसंख्येची गुणवत्ता स्पष्ट होते. कारण साक्षर लोकसंख्येवरून देशातील लोकसंख्येचे तांत्रिक प्रगतीचा दर ठरतो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात साक्षरता प्रमाण खूपच कमी होते.

भारत सरकारने नियोजन काळात देशातील विविध वयोगटातील व्यक्तीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. १४ वर्षाच्या आतील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे. तसेच मुलांना जेवण, शैक्षणिक सुविधा व शिष्यवृत्ती इ. योजना सुरू केल्या आहेत. परिणामी भारतातील साक्षरता प्रमाण वाढलेले दिसुन येते. ही बाब अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. २.८**

**भारतातील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

| वर्ष | एकुण साक्षरता प्रमाण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३ | २७.२ | ८.९ |
| १९६१ | २८.३ | ४०.४ | १५.३ |
| १९७१ | ३४.५ | ४६.० | २२.० |
| १९८१ | ४१.४ | ५३.४ | २८.५ |
| १९९१ | ५२.२ | ६४.४ | ३९.२ |
| २००१ | ६४.८ | ७५.२ | ५३.६ |
| २०११ | ७४.४ | ८२.१ | ६५.४ |

कोष्टक क्रमांक २.८ वरून भारतात साक्षरता प्रमाणात वाढ होताना दिसते. तथापी पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण अद्यापही कमी असलेले दिसून येते.

**✲ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) प्रतिवर्षी दर हजारी लोकसंख्येमागे जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे ......होय.

अ) मृत्यूदर ब) जन्मदर क) साक्षरता प्रमाण ड) यापैकी नाही

२) प्रत्येक १००० पुरूषामागे स्त्रियांचे असणारे प्रमाण म्हणजे.......होय.

अ) जननप्रमाण ब) साक्षरता प्रमाण क) स्त्री-पुरूष प्रमाण ड) यापैकी नाही

३) एक चौरस किलोमीटरच्या क्षेत्रात सरासरी किती लोक रहातात त्यास लोकसंख्येची......म्हणतात

अ) साक्षरता ब) घनता क) जन्मदर ड) यापैकी नही

**२.२.३ लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास :**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधन संपत्ती, मानवी साधन संपत्ती आणि वित्तीय साधने या तीन प्रमुख घटकांवर अवलंबून असतो. किंबहुना कोलीन क्लार्क आणि एव्हरेस्ट हेगिन या अर्थशास्त्रज्ञांच्या मते विकसनशील देशात मोठी आणि वाढती लोकसंख्या ही त्या देशाच्या विकासाला लाभदायक ठरते. अमेरिका, इंग्लड,जपान यासारख्या विकसित राहतात आर्थिक विकासाच्या काळात तेथील वाढत्या लोकसंख्येने आर्थिक विकासात हातभार लावला म्हणजेच वाढती लोकसंख्या ही त्या देशांना उपकारक ठरली असे दिसून येते. असे असले तरी भारताच्या बाबतीत मात्र आर्थिक विकासात नियोजन काळात वेगाने वाढणारी लोकसंख्या ही प्रतिकूल परिणम करीत आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गात वाढती लोकसंख्या अडसर ठरली आहे. हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्न वाढीचे प्रमाण :** भारताच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पनातील वाढीच्या तुलनेने लोकसंख्येतील वाढीचे प्रमाण अधिक आहे. जर देशाचा आर्थिक वृद्धीदर वाढवायचा असेल तर लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे आवश्यक आहे.

**२. अन्नधान्य पुरवठा :** भारतात लोकसंख्या वाढीचा परिणाम म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात अन्नधान्याच्या समस्येला सातत्याने तोंड द्यावे लागत आहे. देशात १९५१ साली ५०.८ दशलक्ष टन असलेले अन्नधान्याचे उत्पादन सन २०११ साली २१८.२ द. ल. टन (२१८.२) इतके होऊनही देशाची लोकसंख्या ३६.१ कोटीवरून आज १२१.१९ कोटी इतकी झाली. म्हणून देशाची अन्नसमस्या सोडविण्यासाठी भारताच्या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**३) बेरोजगारीत वाढ :** वाढत्या लोकसंख्येमुळे भारतातील बेरोजगार लोकांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात ज्या वेगाने रोजगाऱ्यांचा संधी निर्माण झाल्या. त्यापेक्षा अधिक प्रमाणात लोकसंख्येत वाढ झाली. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होण्यासाठी लोकसंख्यावाढ हे महत्वपूर्ण कारण ठरत आहे.

**४) शेतजमीनीवर अतिरिक्त भार :** भारताच्या वाट्याला जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी केवळ २.४% जमिन आलेली आहे. यामध्ये काही वाढ झालेली नाही परंतु गेल्या ६० वर्षात देशाची लोकसंख्या वेगाने वाढते आहे. या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेईल एवढ्या प्रमाणावर देशात औद्येगिकरण तसेच सेवाक्षेत्राचाही विकास झालेला नाही. त्यातही लोकसंख्या वाढीचा दर शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आहे. त्यामुळे शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडतो आहे. यातून शेतीचे विभाजन व तुकडीकरणाची समस्या निर्माण होते आहे.

**५) अनुत्पादक उपभोकत्यांचा वाढता भार :** उत्पादनाला हातभार न लावता जे फक्त देशातील वस्तूंचा उपभोग त्यांना अनुत्पपादक उपभोक्ते म्हणतात सामान्यपणे १४ वर्षाखालील मुले आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ लोकांचा अनुत्पादक उपभोक्त्यात समावेश केला जातो. जवळपास ४०% इतक्या मोठ्या प्रमाणावर अनुपात्दक उपभोक्त्यांच्या भार भारतीय अर्थव्यवस्थेवर असलेला दिसून येतो. परिणामी भारतीय समाजाचे सर्वसाधारण राहणीमान कमी प्रतीचे राहीले आहे. अनुत्पादक उपभोक्त्यांचे ओझे कमी करण्यासाठी लोकसंख्यावाढ नियंत्रित करणे आवश्यक आहे.

**६) सामाजिक सोई–सुविधांवर ताण :** भारतात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शिक्षण आरोग्य, वाहतुक दळणवळण, वैद्यकीय सुविधा, पिण्याचे पाणी  व वीज पुरवठा यासारख्या मूलभूत सोई सुविधांवर अतिरिक्त ताण निर्माण होतो आहे. भारतातील महानगरातून वाढत्या लोकसंख्येमुळे राहत्या घराचा प्रश्न गंभीर बनतो आहे. भारतात बचतीचे प्रमाण कमी असल्याने या बाबींवर भरमसाट खर्च झाल्यामुळे आर्थिक विकासात अडसर निर्माण झाला आहे.

**७) दारिद्र्यात वाढ :** भारतात वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि औद्योगिकरणाचा कमी वेग, शेतीची अल्प उत्पादकता, वाढती बेरोजगारी यामुळे लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. देशातील जवळपास ४०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन जगत आहे. दारिद्र्याच्या दृष्ट्याचक्रामुळे लोकांची कार्यक्षमता कमी होवून आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो आहे.

**८) स्त्री श्रमशक्तीचा अपव्यय :** भारतात जननदर उच्च आहे. साधारणपणे प्रतिवर्षी १ कोटी ६० लाख स्त्रियांची प्रसूती होते. त्यामुळे प्रसूती काळात स्त्रिया काम करू शकत नाहीत. त्यांची श्रमशक्ती वाया जाते. मानवी संसाधनांचा हा अपव्यय आर्थिक विकासाला पायबंद घालतो.

**९) श्रमिकांची कार्यक्षमता घटते :** भारतात वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नात वाढ होण्यात अडचणी येतात. दरडोई उत्पन्न कमी असल्याने श्रमिकांच्या राहणीमानाचा दर्जा निकृष्ट राहतो. सकस आहराचा अभाव, आरोग्यविषयक सोईंचा अभाव, मानसिक अस्वास्थ्य इ. मुळे श्रमिकांची कार्यक्षमता कमी होत जावून आर्थिक विकासाचा वेग मंद राहतो.

**✲ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा**

१) भारतात वेगाने वाढणारी लोकसंख्या ही आर्थिक प्रगतीवर ........... परिणाम करीत आहे.

अ) अनुकूल ब) सकारात्मक क) प्रतिकूल ड) यापैकी नाही

२) कोलीन क्लार्क आणि एवरेस्ट हेगेन यांच्या मते विकसनशील देशात वेगाने वाढणारी लोकसंख्या त्या राष्ट्रांना ............ ठरते.

अ) हानीकारक ब) लाभदायक क) प्रतिकूल ड) यापैकी नाही

३) वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्न ...............

अ) वाढते ब) घटते क) स्थिर राहते ड) संथगतीने वाढते.

४) लोकसंख्या वाढीचा परिणाम म्हणून स्त्री श्रमशक्तीचा ................

अ) अपव्ययय होतो ब) पूर्ण वापर होतो क) अंशतः अपव्यय होतो

ड) पूर्णपणे ऱ्हास होतो.

### २.२.४ भारताचे लोकसंख्याविषयक धोरण : (Population Policy for India)

भारताची सध्याची लोकसंख्या आकाराने खूपच मोठी आहे. या वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न गंभीर बनला असून त्याचा आर्थिक व सामाजिक प्रश्नांशी जवळचा संबंध आहे. भारतात लोकसंख्येची वाढ रोखण्यासाठी योग्य अशा लोकसंख्यविषयक धोरणांची आवश्ययकता आहे. एवढेच नव्हे तर देशातील जनतेचे जीवनमान उंचाविण्यासाठी लोकसंख्याविषयक धोरण आखून त्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

लोकसंख्याविषयक धोरण म्हणजे लोकसंख्येचा आकार व रचना याविषयी सरकारने आखलेले धोरण होय. सामान्यतः देशातील आर्थिक विकासाला भरीव मदत होण्यासाठी लोकसंख्येचा आकार व रचना यावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने आवश्यक व योग्य अशा लोकसंख्या वाढीच्या दराची नीती आखणे म्हणजे लोकसंख्या धोरण होय.

**लोकसंख्या विषयक धोरणाची व्याख्या :**

'लोकसंख्याविषयक धोरण म्हणजे केवळ जननदर नियंत्रणाचा कार्यक्रम नसून लोकांचे आयुर्मान वाढविण्यासाठी ठरविलेली उद्दिष्ट्ये व आखलेल्या योजनांचा कार्यक्रम होय.

भारतातील लोकसंख्याविषयक धोरणांची विविध उद्दिष्ट्ये आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**लोकसंख्याविषयक धोरणांची उद्दिष्ट्ये :**

१. देशातील जननदरात घट घडवून आणणे.

२. लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे.

३. लोकांच्या गुणवत्तेत व कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणणे.

४. आर्थिक विकासाचा वेग वाढविणे.

५. मृत्यूदरात घट घडवून आणणे.

**भारताचे लोकसंख्याविषयक धोरण :**

भारत सरकारच्या लोकसंख्यावियक धोरणाचा आपणांस पुढील दोन टप्प्यात अभ्यास करता येईल.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकसंख्याविषयक धोरण :**

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी भारतातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करुन योग्य अशा लोकसंख्या धोरणाची आखणी केलेली नव्हती. किंबहुना भारतातील वाढत्या लोकसंख्येकडे दुर्लक्षच केले. तथापि, भारतातील तत्कालिन विचारवंत आर.डी. कर्वे, रविंद्रनाथ टागोर, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु इत्यादिंनी भारतात लोकसंख्या नियंत्रणासाठी अनुकूल अशी मते मांडली होती. सन १९३१ मध्ये जनगणना अधिकारी श्रीयुत हटन यांनी लोकसंख्या वाढ रोखल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही असे मत मांडले होते. महाराष्ट्रातील समाजसुधारक प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी मुंबईत १९२५ मध्ये पहिले संततीनियमन चिकित्सालय सुरु केले. सन १९३५ मध्ये पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली लोकसंख्या नियंत्रणासाठी राष्ट्रीय नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. त्यानुसार देशातील वाढती लोकसंख्या कमी करण्यासाठी कौटुंबिक व राष्ट्रीय पातळीवर सुयोग्य धोरण आखण्याच्या विचारावर भर देण्यात आला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंख्याविषयक धोरण :**

भारतातील वाढत्य लोकसंख्येमुळे देशासमोर दारिद्र्य, उपासमार, रोगराई, अन्नसमस्या यासारख्या समस्या निर्माण झाल्या. भारताने सन १९५१ पासून (पंचवार्षिक योजनांचा) आर्थिक नियोजनाचा स्विकार केला. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत भारत सरकारने आपले लोकसंख्याविषयक धोरण आखले आणि त्याची जाणीवपूर्वक अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्याविषयक धोरण कशा

पध्दतीने आखले गेले हे पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

**१) पहिली पंचवार्षिक योजना :**

या योजनेच्या काळात नियोजन मंडळाने कुटुंबनियोजनाचा विस्तृत कार्यक्रम तयार केला. लोकसंख्याविषयक प्रश्नांविषयी जनतेत जागृती करणेच्या प्रमुख हेतूने भित्तीपत्रिका व लहान पुस्तिका छापण्यात आल्या. या योजनेत कुटुंब नियोजनासाठी ६५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात ९८.५ लाख रुपये खर्च करण्यात आले.

**२) दुसरी पंचवार्षिक योजना :**

या योजनेत लोकसंख्या वाढीकडे सरकारचे लक्ष वेधले गेले. सन १९५६ मध्ये मध्यवर्ती कुटुंबनियोजन मंडळाची स्थापना केली. या काळात ५ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात २.३० कोटी रुपये खर्च झाले.

**३) तिसरी पंचवार्षिक योजना :**

या योजनेत कुटुंबनियोजन कार्यक्रमाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. या योजनेत लोकसंख्या नियंत्रणासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. २१०० कुटुंबकल्याण केंद्रे स्थापन करण्यात आली. कुटुंबनियोजन सेवा शासकीय, वैद्यकीय व आरोग्य केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या.

**४) वार्षिक योजना (१९६६ ते १९६९) :**

तीन एक वार्षिक योजनांच्या काळात या कार्यक्रमावर ७२.८३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या काळात भारतीय समाजात कुटुंबनियोजनाविषयी अनुकूल दृष्टीकोन बनविण्यात सरकार यशस्वी झाले.

**५) चौथी पंचवार्षिक योजना :**

लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम मुलभूत कार्यक्रम म्हणून या योजनेत स्विकारण्यात आला. या योजनेत १९७४ पर्यंत जननदर ३० वरुन ३२ वर आणण्याचे उद्दिष्ट्य ठेवले. प्रत्यक्षात तो ३५ वर आला. या काळात 'सेंट्रल फॅमील कौन्सिलची' स्थापना करण्यात आली. देशाच्या ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांना कुटुंबनियोजनाची साधने मिळतील अशी व्यवस्था करण्यात आली.

**६) पाचवी पंचवार्षिक योजना :**

या योजनेत कुटुंबनियोजन कार्यक्रमासाठी ४९२ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले. कुटुंबनियोजन कार्यक्रमाशी संबंधित साक्षरता प्रसार, कामगार शिक्षण, आरोग्य शिक्षण आणि सामाजिक कल्याण इ. कार्ये हाती घेण्यात आले. तत्कालिन काँग्रेस सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्तीच्या मार्गांचा अवलंब केला. परिणामी समाजात असंतोष निर्माण झाला.

### ७) सहावी पंचवार्षिक योजना :

आणीबाणीनंतर सत्तेवर आलेल्या जनता सरकारने 'कुटुंबनियोजन' कार्यक्रमाचे नामकरण 'कुटुंबकल्याण' असे करण्यात आले. लोकांनी स्वखुशीने कुटुंबनियोजनाचा स्विकार करावा असे आवाहन करण्यात आले. तथापी जनता सरकार कोसळल्यामुळे १९८० मध्ये पुन्हा सत्तेत आलेल्या कॉंग्रेस सरकारने आपले नवीन लोकसंख्याविषयक धोरण जाहीर केले. या योजनेत १९४८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

### ८) सातवी पंचवार्षिक योजना :

या योजनेत ग्रामसेवक व ग्रामसेविका यांच्यामार्फत हा कार्यक्रम खेडोपाडी पोहचविण्याचे ठरले. बालमृत्यूदरात मोठी घट घडवून आणण्यावर भर दिला. या योजनेत लोकसंख्या नियंत्रणाबरोबर लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यावर भर दिला.

### ९) आठवी पंचवार्षिक योजना :

या योजनेत कुटुंब लहान आणि मर्यादित ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या योजनेत निव्वळ प्रजनन दर १% पर्यंत साध्य करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी ६७९२ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविण्यात आले.

### १०) नववी पंचवार्षिक योजना :

नवव्या पंचवार्षिक योजनेत अर्भक मृत्यूदर दरहजारी ५० पर्यंत व ढोबळ जननदर दर हजारी २३ पर्यंत कमी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. माता-बालक संगोपन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला.

### ११) दहावी पंचवार्षिक योजना :

राष्ट्रीय विकास आघाडी सरकारने आपले लोकसंख्याविषयक धोरण जाहीर केले. भारताच्या शाश्वत विकासासाठी लोकसंख्या वाढीमध्ये स्थैर्य प्रस्थापित करणे आवश्यक असल्याचे मानण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात अकरा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या. प्रत्येक योजनेत धोरणात्मक उद्दिष्ट्ये ठरविली गेली. तथापि भारतातील लोकसंख्या अपेक्षेप्रमाणे नियंत्रित करणे शासनाला शक्य झाले नाही.

### भारतातील लोकसंख्याविषयक धोरणाचे मूल्यमापन :

स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करुन भारतातील लोकसंख्या नियंत्रित करुन लोकांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न लोकसंख्या विषयक धोरणाच्या सहाय्याने करण्यात आला. यासाठी शिक्षण प्रार, स्त्री शिक्षण, वैद्यकीय सुविधांचा प्रसार, वाहतूक व दळणवळण साधनांच्या सुविधात वाढ याबरोबरच कुटुंबनियोजनाचा प्रभावी कार्यक्रम राबविला. भारतातील लोकसंख्या विषयक धोरणाच्या प्रभावी अंमलबजाावणीचा परिणाम म्हणून सन १९५१ ते सन २००१ या काळात भारतातील जननदर २.५%

वरुन १.८९% पर्यंत कमी झालेला दिसून येतो.

तथापि भारतातील लोकसंख्या नियंत्रित करण्यात भारत सरकारला पूर्णपणे यश मिळालेले दिसून येत नाही. भारतीय लोकसंख्यावाढीचा दर विचारात घेता तो इंग्लंड, अमेरिका, जपान व चीनच्या तुलनेत अधिक असलेला दिसून येतो. भारतात आणीबाणीच्या काळात, कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम सक्तीच्या स्वरुपात राबविल्यामुळे तो जनतेचा कार्यक्रम बनू शकला नाही. देशातील कुटुंबकल्याणाचा कार्यक्रम हा एक सरकारी उपक्रम बनला आहे. याऐवजी हा कार्यक्रम जनतेने स्वयंस्फूर्तीने राबविण्याची आज नितांत गरज आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) लोकसंख्येचा आकार व रचना याविषयी सरकारने आखलेले धोरण म्हणजे ....... धोरण होय.

अ) राजकोषीय ब) मौद्रिक क) लोकसंख्याविषयक ड) रोजगारविषयक

२) स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सरकारने योग्य लोकसंख्या धोरण ...............

अ) तयार केले ब) तयार केले नव्हते क) अपूर्ण ठेवले होते ड) परिपूर्ण होते.

३) जनगणना अधिकारी ......... यांनी लोकसंख्यावाढ रोखल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही असे मत मांडले.

अ) श्रीयुत हटन ब) पंडीत जवाहरलाल नेहरू क) रविंद्रनाथ टागौर ड) म. गांधी

४) जनता सरकारने कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे नामकरण ............. असे केले.

अ) गरीबी हटाव कार्यक्रम ब) कुटुंब कल्याण कार्यक्रम क) रोजगार हमी कार्यक्रम

ड) कुटुंब स्वास्थ्य कार्यक्रम

## २.३ सारांश

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासात त्या राष्ट्रात उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्या हे घटक महत्त्वाचे असतात. भारताचा विचार करता भारतात हे दोन्ही घटक मूबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि भारतातील नैसर्गिक संसाधनांच्या तुलनेने भारतातील लोकसंख्या अतिरिक्त आहे. लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताचा जगात दुसरा क्रमाक लागतो. भारतीय लोकसंख्येचे आकारमान विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात वाढत गेलेले दिसून येते. जगातील इतर देशांच्या विचार करता भारतीय लोकसंख्येच्या वाढीचा दर अद्यापही उच्च असलेला दिसून येतो. भारतीय लोकसंख्येत वेगाने वाढ होण्याची भारतीय लोकसंख्येचा उच्च जननदर आणि वेगाने घटत असलेला मृत्यूदर विवाहाची सर्वत्रिक प्रथा, बालविवाहाची पद्धत, भारताचे हवामान, बहुपत्नीत्व, निरक्षरता, एकत्र कुटुंबपद्धती अंधश्रद्धा, सामाजिक

जागृतीचा अभाव आरोग्य सोयीत वाढ तसेच कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे अपयश इत्यादि विविध कारणे जबाबदार असलेली दिसून येतात.

भारतीय लोकसंख्येच्या रचनात्मक वैशिष्ट्यांचा अभ्यास करता असे लक्षात येईल, की भारतात दरहजारी पुरूषांमागे असणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे. भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण वेगवेगळ्या घटक राज्यात वेगवेगळे असलेले दिसून येते. भारतीय समाजातील पुरूषप्रधान संस्कृती तसेच स्त्रियांकडे पाहाण्याचा दृष्टीकोन  यामुळे भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण दिवसेंदिवस घटत असलेले दिसून येते. भारतीय लोकसंख्येचे वयोगटानुसार वर्गीकरण विचारात घो भारतात परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण खूप मोठे असलेले दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण आरोग्य विषयक सोयींच्या वाढीमुळे ६० वर्षापेक्षा अधिक वयाच्या लोकांचे प्रमाण वाढत आहे आणि उच्च जननदरामुळे १४ वर्षापेक्षा लहान मुलांची संख्या अधिक आहे. त्यामुळे परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते.

भारतीय लोकसंख्येची ग्रामीण-शहरी विभागणी विचारात घेता भारतात ७५% लोकसंख्या अद्यापही ग्रामीण भागात वास्तव्य करते. भारताच्या शहरीकरणाचा दर कमी असलेला दिसून येतो. परिणामी भारतीय लोकसंख्येच्या क्षेत्रिय विभागणीमध्ये प्राथमिक क्षेत्रात लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर काम करतांना दिसते उद्योगक्षेत्राच्या मंद वाढीमुळे औद्योगिक क्षेत्रात तुलनेत कमी लोकसंख्या काम करतांना दिसते अलीकडील काळात सेवा क्षेत्राचा विकास होऊ लागल्याने सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत असलेले दिसते लोकसंख्येची घनता विचाराता घेता भारतीय लोकसंख्येची घनता स्वातंत्र्यांनतर वेगाने वाढत आहे. किंबहूना भारताच्या सर्व प्रदेशात ती एकसारखी नाही. दिल्ली सारख्या राज्यात ती सर्वाधिक तर अरूणाचल प्रदेशात ती कमी असलेली दिसून येते. लोकसंख्येची घनता वाढल्यामुळे सामाजिक मूलभूत सुविधावर अतिरिक्त ताण येतो आहे. भारतीय लोकसंख्येच्या सरासरी आयुर्मानाता आणि साक्षरतेत स्वातंत्र्यानंतर वाढ होतांना दिसते. मात्र भारतातील पुरूषांच्या पेक्षा स्त्रियांचे सरासरी आयुर्मान व साक्षरता प्रमाण कमी असलेले दिसून येते. त्यात वाढ घडून येणे आवश्यक आहे.

लोकसंख्येतील वाढीचा भारताच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतांना दिसतो आहे. राष्ट्रीय उत्पन्न वाढूनही दरडोई उत्पन्नात वाढ होताना दिसून येत नाही. देशात अन्नधान्याची टंचाई, शेतीवरील अतिरिक्त भार, वाढती बेकारी, अनुत्पादक उपभोक्त्यांचा वाढता भार मूलभूत सोईसुविधावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. तसेच भांडवल निर्मितीच्या दरावर प्रतिकूल परिणाम,स्त्रियांची श्रमशक्ती वाया जाणे, दारिद्र्यात वाढ यासारखे गंभीर परिणाम भारतात दिसून येत आहेत. परिणामी भारताच्या आर्थिक विकासात अडसर निर्माण झालेला दिसून येतो आहे. भारताची लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर नियोजनामुळे मिळणारे फायदे भारतीय समाजाला मिळणार नाहीत म्हणून लोकसंख्येचे नियंत्रण ही काळाची गरज  बनली आहे. यासाठी भारत सरकार लोकसंख्या विषयक धोरण राबवितांना दिसते.

स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतात लोकसंख्या नियोजनाबाबत आर. डी. कर्वे, महात्मा गांधी, पं. नेहरू,

रविंद्रनाथ टागोर, इत्यादि व्यक्तींचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्याकाळात भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या सुरवातीपासूनच स्वंतत्र असे लोकसंख्याविषयक धोरण आखले व त्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या नियंत्रणासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून त्यासाठी खर्चाची तरतूद केलेली दिसून येते. आतापर्यंत पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या. मात्र लोकसंख्या नियंत्रणासाठी भारत सरकारला पूर्णपणे यश आलेले दिसत नाही. त्यासाठी सरकार बरोबरच स्वयंसेवी संस्था, खाजगी उद्योजक, शिक्षण संस्था इ. नी सामजिक कल्याणाच्या हेतूने हा कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने राबविणे आवश्यक आहे. तसे झाले तरच लोकसंख्या वाढ रोखणे शक्य होऊन भारताची आर्थिक प्रगती वेगाने घडून येईल.

**२.४ पारिभाषिक शब्द**

१) नैसर्गिक संसाधने – मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी व निसर्गात: विनामुल्य उपलब्ध असणारी साधने

२) बहुपत्नित्व – एक पुरूषाने दोन किंवा अधिक स्त्रियांशी विवाह करणे

३) शिरगणती – लोकसंख्येची मोजदाद करणे

४) पंचवार्षिक योजना – आर्थिक विकास साधण्यासाठी सरकारने पाच वर्षाच्या कालावधीसाठी तयार केलेली योजना

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

| | | |
|---|---|---|
| २.२.१ | १) ब | २) क |
| २.२.२ | १) ब | २) क |
| | ३) ब | |
| २.२.३ | १) क | २) ब |
| २.२.४ | १) क | २) ब |
| | ३) अ | ४) ब |

**२.६ सरावासाठी प्रश्न**

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) भारतातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येची कारणे लिहा.

२) भारतीय लोकसंख्येची रचनात्मक वैशिष्ट्ये सांगा.

३) भारतातील लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावर कोणता परिणाम झाला ते स्पष्ट करा.

४) भारताचे लोकसंख्या विषयक धोरण स्पष्ट करा

**ब) टीपा लिहा :**

१) लोकसंख्येचे आकारमान

२) भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण

३) जननदर व मृत्यूदर

४) लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी

५) लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम

६) भारताचे लोकसंख्याविषयक धोरण

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. घाटगे, एल एन आणि डॉ. वावरे, ए. के. (२०१०) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन १३१२, शिवाजीनगर पुणे ४११००५. प्रथमावृत्ती.

२) Ruddar Datt &.K.P. M. Sundharam (2004) Indian Ecomomy S.chand & Company Ltd, Ram Nagar New Delhi 110055

३) ए. बी. सवदी आणि पी. एस.कोळेकर, १९९५ मानवी लोकसंख्या भूगोल निराली प्रकाशन ४१ बुधवार पेठ पुणे ४११००२

४) डॉ देसाई व डॉ. सौ. भालेराव १९९८ भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन ४१, बुधवार पेठ पुणे ४११००२ बी.ए.भाग-१ : भारतीय अर्थव्यवस्था/३

५) Census of India - 2011 Govt. of India

❖❖❖